ePaper

## लाल वादळ आज नाशिकमध्ये धडकणार, शेतकरी करणार चक्का जाम



|| वर्ष - 7 । अंक - 280 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- भारतासमोर १९२ धावांचे लक्ष्य
- नवरा म्हणून माझ्यात काय कमी
- आमचे नागरीकही तसे नाहीत!
- पवारांच्या राष्ट्रवादीची परिस्थिती बिकट

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 26 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# लोकसभा निवडणूक 'करो या मरो'ची!

## » आदित्य ठाकरे यांचा घणाघात : भाजपामुळे लोकशाही धोक्यात!

। पिंपरी । महाईन्यूज

**सरकार बदलत असतात, पण देश आणि संविधान याला हात लावायला कोणी हिंमत केली नव्हती. संविधान बदलायची भाषा अजून कोणी केली नव्हती. देशाच्या लोकशाहीला धोका निर्माण होईल असं कृत्य कधीही कोणी केलं नव्हतं. पण आज आपल्या देशाला हाच धोका निर्माण झालेला आहे. ही निवडणूक झाली आणि चुकून भाजपाने बहुमत काबीज केलं, तर पाच वर्षानंतर निवडणूका होईल की नाही? याच्यावर आपल्याला विचार करण्याची वेळ आली आहे. म्हणून आपल्याला मावळसह आणि प्रत्येक जागा जिंकावी लागणारच आहे. आता 'करो या मरो' ही अशीच निवडणूक झालेली आहे, असे मत युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केले.**





आदित्य ठाकरे आज पिंपरी चिंचवड शहराच्या दौऱ्यावर होते. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मावळ लोकसभा मतदार संघातील पदाधिकाऱ्यांची संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी पुणे जिल्हा संपर्कप्रमुख तथा आमदार सचिन आहेर, मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील, माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार, पिंपरी चिंचवड मावळ संपर्क प्रमुख लतिका पाष्टे, पिंपरी चिंचवड शहर प्रमुख ॲड. सचिन भोसले, ज्येष्ठ नेते एकनाथ पवार, जिल्हा संघटिका सुलभा उबाळे, अनिताताई तुतारे, शहर युवा अधिकारी चेतन पवार, उपजिल्हाप्रमुख वैशाली मराठे, निलेश मुटके, धनंजय आल्हाट, तुषार नवले, अनंत कोऱ्हाळे, रोमी संधू, हाजी मणियार दस्तगीर, डॉ. वैशाली कुलथे, कल्पना शेटे, तुषार नवले, मिनल यादव आदींसह पक्षाचे उपशहरप्रमुख, संघटक, उपसंघटक, सर्व प्रमुख पदाधिकारी आणि शिवसैनिक या मेळाव्यास उपस्थित होते.

### 370 कलम महाराष्ट्रावर लावलंय का?

**» नेहरू, गांधी, कॉंग्रेसने ६५ वर्षांत काय केलं असं २०१४ पूर्वी म्हणणं योग्य होतं. पण आता हे म्हणतात ७५ वर्षात कॉंग्रेसने काय केलं? आता सांगा ही १० वर्षे भाजपकडे आहेत. त्यातील पाच वर्षे आपण त्यांच्यासोबत होतो, कारण अच्छे दिन येणार म्हणाले म्हणून आपण ही त्यांच्या प्रचार केला. मात्र अच्छे दिन आलेत का? महागाई किती वाढली आहे, बेरोजगारांच्या हाताला रोजगार आहे का? हे अंधभक्तांनी ही लक्षात घ्यावं. आज 370 कलम महाराष्ट्रावर लावलंय का? अशीच परिस्थिती सध्या आपल्या राज्यात निर्माण झालेली आहे, असेही आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.**

### मावळचे खासदार गप्प का होते?

**»मावळ लोकसभेतून गद्दार लढतील का? याची अद्याप खात्री नाही. तळेगाव मधून वेदांता हा उद्योग गुजरातला गेला तेव्हा मावळचे खासदार गप्प का होते? असा सवालही ठाकरे यांनी उपस्थित केला. मावळ लोकसभा हा आपला हक्काचा मतदारसंघ आहे. त्यामुळे आता येथून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाच खासदार निवडून गेला पाहिजे. त्यासाठी आपण मैदानात उतरणार असल्याचे शेवटी बोलताना ते म्हणाले.**

आदित्य ठाकरे म्हणाले की, पाच वर्षानंतर निवडणुका होतील की नाही? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळं ही लोकसभा निर्णायक ठरणार आहे. लोकशाही संपविण्याचा, संविधान मोडीत काढण्याचा डाव या सरकारचा आहे. २०२३ मध्ये एक पक्ष फोडला, मग एक कुटुंब फोडलं. आता २०२४ मध्ये कॉंग्रेस पक्षात फूट पाडली जात आहे.

# शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीत गंडवले!

## » तब्बल 1 कोटी 30 लाखांची फसवणूक : वाकडमध्ये दोघांना अटक

। पिंपरी।महाईन्यूज । प्रतिनिधी।

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या बहाण्याने एका व्यक्तीची एक कोटी ३० लाख ३८ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना एक डिसेंबर २०२२ ते २३ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पिंपळे सौदागर येथे घडली.



दीपक अनंत आवटे (३५, रा. महाळुंगे, पुणे) यांनी वाकड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, विश्वभूषण वाल्मीक गायकवाड (२४, रा. पिंपरी), कुलभूषण वाल्मीक गायकवाड (२३, रा. पिंपरी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून त्यांच्यासोबत समजूतीचा करारनामा केला.

त्यानुसार, फिर्यादी यांना एका बँक खात्यावर पैसे भरण्यास भाग पाडले. फिर्यादी यांनी आरोपींच्या बँक खात्यावर एक कोटी ३० लाख ३८ हजार रुपये जमा केले.

### पैशांवरील व्याज आणि मुद्दल परतफेड झालीच नाही...

» दरम्यान, आरोपी शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करणार होते. दरम्यान, आरोपींनी फिर्यादी यांना ४१ लाख ६५ हजार ३७० रुपये पाठवले. त्यानंतर फिर्यादी यांनी दिलेल्या पैशांवरील व्याज आणि मुद्दल परतफेड करण्यास टाळाटाळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. वाकड पोलिस तपास करीत आहेत.

# राष्ट्रवादीच्या घोटाळ्यांची चौकशी करा!

## मोदींना आव्हान देताना उपमुख्यमंत्री अजित पवारांची कोंडी

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**भाजपाची ज्या राज्यात सत्ता नाही, त्या राज्यातील सरकारांविरोधात असहकार पुकारण्याची नवी पद्धत मोदी सरकारने सुरू केली असल्याची टीका शरद पवार यांनी केली. तसेच गेल्या काही काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर सिंचन घोटाळा, राज्य सहकारी बँकेतील घोटाळ्याचे आरोप केले होते. आमची मागणी आहे की, या घोटाळ्यांची त्यांनी चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, असे आव्हान पंतप्रधान मोदी यांना देत असताना शरद पवार यांनी एकप्रकारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. पुणे जिल्ह्यात पार पडलेल्या इंडिया आघाडीच्या मेळाव्यात शरद पवार यांनी मोदी सरकारवर टीकास्त्र सोडले.**



देशाचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्यावर टीका करण्याची एकही संधी पंतप्रधान नरेंद्र मोदी सोडत नाहीत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (एसपी) प्रमुख शरद पवार यांनी केली. "ज्या नेत्यांनी देशाला दिशा देण्याचे काम केले, त्यांच्याविरोधात द्वेष पसरविण्याचे काम केले जात आहे. पंडित नेहरुंनी देशातील संसदीय लोकशाहीला बळकट करण्याचे काम केले. भारताचे मोल जगाला उमजेल, याची जबाबदारी नेहरुंनी पार पाडली. संपूर्ण विश्वाने त्यांच्या कार्याची दखल घेतली होती. पण पंतप्रधान मोदी त्यांच्या योगदानाला किंमत देत नाहीत. पंतप्रधान मोदींच्या समोर माईक आला की लगेच ते पंडित नेहरुंवर टीका करण्यास सुरुवात करतात", अशा शब्दात शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली.

आगामी लोकसभा निवडणुकी आधी विरोधकांची ताकद दाखवून देण्यासाठी इंडिया आघाडीचा पहिला मेळावा शनिवारी (दि. २४ फेब्रुवारी) पुण्यातील काँग्रेस भवनात झाला. यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना (उबाठा) नेते सचिन अहिर यांनीही सरकारवर टीका केली. तसेच शरद पवार बोलत असताना त्यांनी मोदी सरकारवर टीकास्त्र सोडले. शेतातील तण आपण ज्याप्रमाणे उपटतो, त्याप्रमाणे हे सरकार उखडून फेकावे लागेल, असेही शरद पवार यावेळी म्हणाले.

### मोदी गॅरंटीला तारीख नाही

» शरद पवार पुढे म्हणाले की, केंद्र सरकारकडून नव्या योजना आणि गॅरंटी देण्याची स्पर्धा सुरु आहे. पण मोदी की गॅरंटीला कोणतीही तारीख नाही. गेल्या सत्तर वर्षांत अनेक राज्यकर्ते पाहिले. भाजपचे अटलबिहारी वाजपेयी यांचेही सरकार पाहिले. मात्र गेल्या दहा वर्षांत मोदी यांची भूमिका देशाला दिशा देणाऱ्या व्यक्तींविषयी जनतेच्या मनात घृणा निर्माण करण्याची आहे. त्यामुळे लोकशाहीची चिंता वाटत आहे. नेहरू आणि त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ले करण्याचा आणि त्यांना बदनाम करण्याचा एककलमी कार्यक्रम मोदी यांचा आहे, असा आरोपही त्यांनी केला.

भारताची लोकशाही संविधानावर आधारित असून मागच्या १० वर्षांत लोकशाहीवर हल्ले होत आहेत. आगामी निवडणुकीत मतदारच मोदी सरकारच्या चुकीच्या कामांना उत्तर देतील. एकाबाजूला लोकशाही धोक्यात आलेली असताना दुसऱ्या बाजूला सामान्य माणसाला एक ना अनेक अडचणींना सामना करावा लागत आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत. युवकांना रोजगार मिळवण्यासाठी धडपडावे लागत आहे. तर महागाईचा दर वाढतच असून सामान्य माणसाचे कंबरडे मोडले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकाच्या चुकीच्या धोरणांमुळे हे सर्व होत असल्याची टीकाही शरद पवार यांनी केली.

### भाजपा पक्ष, घर फोडतच होते, आता पेपरही फोडते

ज्यांनी लाठ्याकाठ्या खाऊन भाजपला सत्तेवर आणले, ते आज कुठेच दिसत नाहीत. सत्तेच्या पंगतीत भलतेच जेवताना दिसत आहेत. ज्यांनी अशोक चव्हाणांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांनीच चव्हाणांना भाजपमध्ये घेतले. भाजपने पक्ष, घरे तर फोडलीच, त्यासोबत पेपरही फोडण्याचे काम केले. देवेंद्र फडणवीस यांनी आजवर जे आरोप केले, त्याची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी सुप्रिया सुळे यांनी केली.

# बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीचा मार्ग मोकळा

## शिक्षणमंत्र्यांबरोबर झालेल्या चर्चेनंतर बहिष्कार मागे

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या मागण्या मान्य केल्यामुळे बारावीच्या उत्तर पत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे घेतल्याचे महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे यांनी जाहीर केले आहे.**

शिक्षण सचिव रणजीतसिंह देवल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, सहसचिव तुषार महाजन, महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, समन्वयक प्रा मुकुंद आंधळकर, सरचिटणीस प्रा. संतोष फासगे, उपाध्यक्ष प्रा. सुनील पूर्णपात्रे बैठकीला उपस्थित होते.जुन्या पेन्शन योजनेसाठी राज्य शासन शासकीय कर्मचाऱ्यांना जे आदेश लागू करेल, तेच कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना लागू होतील असे मान्य करण्यात आले. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासन अनुकूल असून त्याबाबत लवकरच निर्णय जाहीर होणार आहे. शिक्षकांना शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे लाभ देण्यात येतील हे स्पष्ट करण्यात आले. वाढीव पदावरील प्रलंबित असलेल्या २५३ शिक्षकांच्या त्रुटी पूर्तता करण्यात आल्या



असून वित्त विभागाच्या सहमतीने लवकरच त्यांच्या समायोजनाचा आदेश निर्गमित करण्यात येईल. २००१ पासून आयटी विषयाच्या मान्यताप्राप्त शिक्षकांना वेतनश्रेणी मिळण्याबाबतचा प्रश्न प्रलंबित होता. या बाबतीत या शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हता लक्षात घेऊन मान्यताप्राप्त शिक्षकांचे रिक्त पदावर समायोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. शिक्षकांचे समायोजन ६० दिवसात करण्यात येईल. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना १०, २०, ३० वर्षांची सुधारित सेवांतर्गत वेतनश्रेणी देण्याची योजना शिक्षकांना लागू करण्याबाबत वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून तोपर्यंत शिक्षकांना निवड श्रेणी साठी लागू असलेली २० टक्क्यांची अट उच्च शिक्षणाप्रमाणे शिथिल करण्यात येईल असेही मान शिक्षण मंत्री महोदयांनी मान्य केले. २०/४०/६० टक्के अनुदान घेत असलेल्यांना पुढील टप्पा लवकरच लागू करण्यात येईल असे मान्य करण्यात आले. शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शिक्षण विभागाने २१६७८ पदे भरण्याची प्रक्रिया सुरू केली असून उर्वरित पदे लवकरच भरण्यात येतील असे सांगितले. उर्वरित मागण्यांबाबत आगामी १५ दिवसात बैठक घेण्यात येईल, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

### पुन्हा आंदोलन करावे लागणार नाही

» विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन, शिक्षणमंत्र्यांनी मागण्या मान्य केल्याने उत्तरपत्रिका तपासणीवरील बहिष्कार मागे घेतला आहे. २१ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत भाषा विषयांच्या परीक्षा झाल्या आहेत. अद्याप ५० लाखांहून अधिक उत्तरपत्रिका तपासणीचे काम बाकी होते. बहिष्कार मागे घेतल्याने आता ते काम सुरू होईल. तसेच कार्य सुरू झाले नव्हते ते आता सुरू होणार असल्याने बारावीचा निकाल वेळेवर लावण्यात येईल, शिक्षण विभागाने मान्य केलेल्या मागण्यांची अंमलबजावणी विनाविलंब करून शिक्षकांना पुन्हा आंदोलन करावे लागणार नाही.

# ‘डिफेन्स एक्स्पो’ला प्रचंड प्रतिसाद!

## विद्यार्थी-नागरिकांची गर्दी: उद्योजकांनीही दिली पसंती

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इंटरनॅशनल एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर मोशी येथे सुरू असलेल्या देशातील सर्वात मोठ्या आणि महाराष्ट्रातील पहिल्या भव्य ‘महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो’मध्ये प्रदर्शित संरक्षण तंत्रज्ञान आणि सामुग्री पाहण्यासाठी दुसऱ्या दिवशीही विद्यार्थी, नागरिक तसेच उद्योजकांनी गर्दी केली.**



दुपारपर्यंत एक लाख 20 हजारापेक्षा अधिक नोंदणी झाली असून संरक्षण विषयक आधुनिक तंत्रज्ञानाविषयी जाणून घेण्यात तरुणाईने विशेष रस दाखविला आहे.

राज्याचा उद्योग विभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या पुढाकाराने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शनिवारी या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. देशातील संरक्षण उत्पादन क्षेत्रातील शासकीय संस्थांसह अनेक मोठ्या खाजगी संस्था आणि एमएसएमईंनी यात सहभाग घेतला असल्याने प्रदर्शन विशेष ठरले आहे. देशाच्या संरक्षण सज्जतेच्याच्यादृष्टीने अलौकीक कार्य करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी प्रदर्शनामध्ये पन्हाळा, सिंधुदुर्ग, शिवनेरी व रायगड किल्ल्यांच्या नावाने चार भव्य मंडप उभारण्यात आले आहेत.

प्रत्येक मंडपामध्ये सुमारे 100 ते 150 दालने आहेत. संपूर्ण परिसरात महाराजांच्या गड-किल्ल्यांची संकल्पना चित्रीत करण्यात आली आहे.

### देशाची संरक्षण सिद्धता पाहण्याचा रोमांचित करणारा अनुभव

» प्रदर्शनात एमएसमएईंची 418 लहान आणि 33 मोठी दालने आहेत. भारतीय लष्कराच्या तीन्ही दलांनी प्रदर्शनात सहभाग घेतला असून अत्याधुनिक संरक्षण सामुग्री प्रदर्शित केली आहे. युद्धात उपयोगता येणारी प्रक्षेपणास्त्रे, रणगाडे, हेलिकॉप्टर, विविध प्रकारच्या गन्स जवळून पाहण्याचा रोमांचित करणारा अनुभव नागरिकांना घेता येत असल्याने आबालवृद्धांमध्ये उत्साह दिसत आहे. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थी तज्ज्ञांना प्रश्न विचारून माहिती जाणून घेत आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील उद्योजक, लष्कराचे वरिष्ठ अधिकारी आणि तज्ज्ञांचा सहभाग असलेली चर्चासत्रेदेखील अभियांत्रिकीचे विद्यार्थी आणि एमएसएमईंना उपयुक्त ठरत आहेत. या चर्चासत्रांनाही चांगली उपस्थिती लाभली आहे.

### युवकांना संरक्षण क्षेत्रातील संधींची माहिती

**» राज्यात प्रथमच होत असलेल्या या प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांमध्ये युवकांची संख्या अधिक आहे. जिल्हा आणि जिल्ह्याबाहेरीलही महाविद्यालयांचे विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले आहेत. तरुणांना भारतीय वायुसेनेत सहभागी होण्यासाठी आकर्षित करण्यासाठी हवाई दलाने या ठिकाणी माहिती देणारा कक्ष उभारला आहे. वायुसेनेच्या विविध कामांची आणि हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी या ठिकाणी इंडक्शन पब्लिसिटी अँण्ड एक्झिबिशन व्हेईकल (आयपीईव्ही) ठेवण्यात आले आहे. भारतीय हवाई दलाच्या सेवेत अधिकारी म्हणून तसेच अग्निवीरवायू (पुरुष आणि महिला) म्हणून रुजू होण्याचे फायदे काय आहेत, तसेच रुजू होण्यासाठी नियमांबद्दल माहिती देण्यात येत आहे.**

---

# पर्यावरण समतोलासाठी सायकल उत्तम पर्याय!

## अमित गोरखे यांचे आवाहन : माफक दरात सायकल वाटप उपक्रम

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पूर्वी पुणे पिंपरी चिंचवड शहर हे सायकलचे शहर म्हणून ओळखल जात होते. त्यानंतर काळ बदलत गेला, मोटार सायकली आल्या, तसा तसा पर्यावरणाचा ही समतोल ही बिघडत गेला. आज पुन्हा आपल्याला पर्यावरणाचा समतोल तसेच आपले आरोग्य (फिटनेस) ही सांभाळता येईल अशासाठी आपण पुन्हा एकदा सायकल हा पर्याय निवडावा असे अमित गोरखे यांनी पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना आवाहन केले.**



आज संपुर्ण शहरातील नागरिकांना अमित गोरखे यांच्या विशेष प्रयत्नातून अत्यंत माफक दरात सायकल उपलब्ध करुन देण्यात आल्या. या वेळी पहिल्या टप्यात ४४७ सायकलचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला भाजपा पदाधिकारी, कैलास कुटे, गणेश लंगोटे, नंदू भोगले, सूर्यकांत मोहिते, तसेच संभाजी नगर चिंचवड मधील महात्मा फुले ज्येष्ठ नागरिक संघातील बबन दत्तात्रय वाडेकर, रामदास जाधव, सोपान साबळे, बाबासाहेब शिंदे, यशवंत ठाकूर, विलास पवार, महादेव भडांगे, कैलास तापकीर आदी सर्व ज्येष्ठ नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.


### सामाजिक उपक्रमाचा संकल्प...

**»शहरात सायकलचे प्रमाण वाढावे यासाठी सामाजिक उपक्रमाच्या हेतूने अमित गोरखे यांनी हा पुढाकार घेऊन ही संकल्पना राबवली. यावेळी माजी नगरसेविका अनुराधा गोरखे यांनी ही आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की, सायकल ही पुन्हा काळाची गरज बनत चालले आहे. सायकल ही पर्यावरण आणि शारिरीक आरोग्यासाठी सुद्धा महत्वाची आहे. लहान मुलांपासून ते जेष्ठा पर्यंत सर्वांसाठी महत्वाची आहे.**




# ‘चिप’ क्षितिजावर जपानचा उदय

**१९५० – ६० च्या दशकात सेमीकंडक्टर संशोधन क्षेत्र तसंच चिप उद्योगावर अमेरिकेचा निर्विवादपणे वरचष्मा होता. एका बाजूला एमआयटी, प्रिन्स्टनसारखी विद्यापीठं आणि बेल लॅब्ससारख्या अग्रणी अमेरिकी संशोधन संस्था सेमीकंडक्टरच्या मागचं भौतिकविज्ञान उलगण्याचं काम करीत होत्या.** तर दुसऱ्या बाजूला टेक्सास इन्स्ट्रुमेंट्स (टीआय) आणि फेअरचाइल्डसारख्या कंपन्या चिपनिर्मितीसाठी आवश्यक असलेली अभियांत्रिकी यंत्रणा व्यावसायिकरीत्या उभारून चिप उद्योगाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या कामात गुंतल्या होत्या. चिप उद्योगाचं जन्मस्थान अमेरिका असल्याने तिची चिप उत्पादन आणि चिप-आधारित इलेक्ट्रॉनिक क्षेत्रावर मक्तेदारी असणं साहजिकच असलं तरीही अशी परिस्थिती फार काळपर्यंत टिकून राहणार नव्हती.चिपचं उत्पादन भले अमेरिका-केंद्रित आणि अमेरिकी कंपन्यांच्या चार भिंतींच्या आत (एकस्व- पेटंट वगैरे उपायांचा वापर करून) सुरक्षित असलं तरीही सेमीकंडक्टर विज्ञानासंदर्भातील नावीन्यपूर्ण संशोधन तसंच अकादेमिक दस्तऐवज विविध संशोधन पत्रिकांमध्ये नियमितपणे प्रकाशित होत होतं. या संशोधन पत्रिका अमेरिकेबाहेरही उपलब्ध होत असल्यानं जगभरातल्या अग्रणी संशोधकांना आणि शासनाच्या विज्ञान तंत्रज्ञान विभागांमधल्या



प्रशासकांना सेमीकंडक्टर विषयातल्या प्रगतीचा अदमास येऊ लागला होता. या तंत्रज्ञानात इतर देशांच्या तुलनेत दोन देशांच्या सरकारांनी खूप आधीपासूनच विशेष रस घेतला. त्यापैकी एक म्हणजे अमेरिकेचा शीतयुद्धातला प्रमुख प्रतिस्पर्धी देश रशिया! आता रशियानं या तंत्रज्ञानात स्वारस्य दाखवणं यात अचंबित होण्यासारखं काहीच नव्हतं. अमेरिकेप्रमाणे रशियाही संशयग्रस्त होताच. सेमीकंडक्टर तंत्रज्ञानातील प्रगती अमेरिकेला लष्करी दृष्टिकोनातून आपल्यापेक्षा सामर्थ्यवान बनवेल का ही भीती रशियाला सतावत होती. म्हणूनच हे तंत्रज्ञान आणि चिपनिर्मितीची क्षमता आपल्याकडे असायला हवी अशी निकड रशियाला भासत होती. त्यासाठी रशियानं जमेल त्या मार्गानं हे तंत्रज्ञान स्वदेशी आणण्याचा खटाटोप सुरू केला. अमेरिकेकडून अधिकृतपणे हे तंत्रज्ञान मिळणं अशक्यप्राय आहे हे लक्षात आल्यावर रशियानं वाममार्गाचा अवलंब करायला सुरुवात केली. आपली गुप्तहेर संस्था केजीबीच्या मदतीनं अमेरिकी संशोधनसंस्था व कंपन्यांची महत्त्वाची कागदपत्रकं मिळवणं, ‘विद्यार्थ्यांची देवाणघेवाण’ (स्टुडंट्स् एक्स्चेंज) सारख्या कार्यक्रमांचा गैरवापर करून विद्यार्थ्यांऐवजी आपले हेर अमेरिकेत पाठवणं असले प्रकार रशियानं आरंभले. दुसरीकडे रशियन नेतृत्वानं अमेरिकेच्या ‘सिलिकॉन व्हॅली’ची प्रतिकृती म्हणून ‘झेलेनोग्राड’ या नव्या शहराची निर्मिती करण्याचा मनोदय जाहीर केला. पण अनेक प्रयत्न करूनही रशिया चिप तंत्रज्ञानात अमेरिकेच्या (आणि पुढल्या काळात पूर्व आशियाई देशांच्या) जवळपासही पोहोचू शकला नाही. सेमीकंडक्टर तंत्रज्ञानात व चिपनिर्मितीत अमेरिकेच्या बरोबरीनं उभं राहण्यासाठी सुरुवातीपासून रशियानं एकाच पद्धतीचं धोरण राबवलं, ते म्हणजे सर्व बाबतीत अमेरिकेची नक्कल करण्याचा प्रयत्न करणं. वास्तविक, रशियात बुद्धिमान भौतिकशास्त्रज्ञ किंवा अभियंत्यांची कमतरता होती अशातला भाग नव्हता. (२००० सालचा नोबेल पुरस्कार जॅक किल्बीसोबत, जोरेस अल्फेरॉव्ह या रशियन शास्त्रज्ञाला त्याच्या सेमीकंडक्टर विज्ञानातील कार्यासाठी विभागून देण्यात आला होता.) जो देश अंतराळात स्वबळावर कृत्रिम उपग्रह आणि मानव पाठवू शकत होता त्याला या तंत्रज्ञानात आघाडी घेणं अशक्य कोटीतली गोष्ट नव्हती. पण पोलादी साम्यवादी राजवटीत शीर्षस्थ नेतृत्व आणि त्याच्या खास मर्जीतील मंत्री/ नोकरशहा यांचाच शब्द अंतिम असल्यानं वैज्ञानिक प्रगतीला काहीशी खीळ बसली. त्याचबरोबर अशा नावीन्यपूर्ण विषयांतल्या संशोधनासाठी ज्या खुल्या वातावरणाची किंवा व्यावसायिक आणि अकादेमिक आस्थापनांमध्ये होणाऱ्या वैचारिक देवाणघेवाणीची गरज असते, त्याचाच रशियात संपूर्णपणे अभाव होता. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे चिपनिर्मिती तंत्रज्ञान इतक्या झपाट्यानं पुढे जात होतं की केवळ त्याची नक्कल करून भागणार नव्हतं.

## संपादकीय »

# तुमची कमी!


***पंजाबातले शेतकरी किमान आधारभूत किमतीसाठी (एमएसपी) आंदोलन करत असताना केंद्र सरकारने उसासाठी रास्त किफायतशीर दर (एफआरपी) वाढवण्याचा निर्णय जाहीर केला.***

पंजाबातले शेतकरी किमान आधारभूत किमतीसाठी (एमएसपी) आंदोलन करत असताना केंद्र सरकारने उसासाठी रास्त किफायतशीर दर (एफआरपी) वाढवण्याचा निर्णय जाहीर केला. यातील कार्यकारणभाव सूचक. पंजाबात गहू- तांदूळ प्राधान्याने पिकतो आणि ऊस हे महाराष्ट्र, उत्तर प्रदेशचे पीक. पंजाबात केंद्रीय सत्ताधारी पक्षास काहीही स्थान नाही आणि आगामी निवडणुकांत उत्तर प्रदेश, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाठिंब्याची गरज त्या पक्षास आहे. तेव्हा पंजाबातील शेतकरी आणखी चिडले तरी विद्यमान सत्ताधाऱ्यांचे फारसे काही बिघडणारे नाही;करूनही काही मिळत नसताना, उत्तर प्रदेश, महाराष्ट्रातील बागायती शेतकऱ्यांना न मागताही अधिक दर दिला जात असताना, राजकीयदृष्ट्या संवेदनशील पिकांचे आणि ते पिकवणाऱ्या शेतकऱ्यांचे कोडकौतुक केले जात.

न्यायाचा विचार करताना तराजूचे चित्र डोळ्यासमोर येते. एका पारड्यात एक वस्तू ठेवलेली असते आणि दुसऱ्या पारड्यात किलोमधले वजन. कोणतेच पारडे झुकले नाही, संतुलन साधले की आपण आपल्याला हवी ती वस्तू ठरलेल्या किमतीला विकत घेतो. हीच गोष्ट न्यायाबाबत आहे. व्यक्तिचे मोल कशात तोलायचे.

# न्यायाचा विचार करताना तराजूचे चित्र डोळ्यासमोर

असा प्रश्न इथे उपस्थित होतो. त्यासाठी स्वातंत्र्य समता सहभावाच्या (बंधुतेऐवजी ‘सहभाव’ हा लिंगभाव-निरपेक्ष शब्द वापरला आहे.) मूल्यासोबतचे न्यायाचे नाते समजून घ्यायला हवे.स्वातंत्र्य आणि समतेला अर्थ येतो सहभावामुळे तर स्वातंत्र्य आणि समतेच्या संतुलनातून न्यायाचे तत्त्व आकाराला येते. न्यायाचे तत्त्व हे ‘स्वातंत्र्य-समता-बंधुता’ याचे पर्यायी नाव आहे, असे बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते. त्यामुळेच न्यायाचे आकलन करून घेण्यासाठी समाजातील साधने आणि संसाधने यांचे वाटप कसे झाले आहे, हे पाहणे जरुरीचे असते. ही न्यायाची संकल्पना वेगवेगळ्या प्रकारे समजून घेता येते. जॉन रॉल्स (१९२१-२००२) या विचारवंताने न्यायाबाबत दोन सूत्रे सांगितली आहेत. समाजातल्या प्रत्येकाला समान संधी असली पाहिजे आणि स्वातंत्र्याचा अवकाश असला पाहिजे, हे पहिले सूत्र. समाजातल्या सर्वात वंचित घटकाला सर्वाधिक



फायदा मिळेल अशा प्रकारे संसाधनांचे वितरण झाले पाहिजे, हे दुसरे सूत्र. या दुसऱ्या सूत्राचा आशय गांधीजींनी कैक वर्षांआधी मांडलेल्या ‘अंत्योदय’ या संकल्पनेतही ढोबळमानाने दिसतोच. ‘विकासाची दिशा समाजातील सर्वात मागास घटकाला न्याय मिळाला पाहिजे, यानुसार असावी’ अशी गांधींची धारणा होती. कार्ल मार्क्ससारख्या समाजशास्त्रज्ञाने व्यक्ती तिच्या ‘क्षमतेनुसार काम’ करेल आणि तिला ‘गरजेनुसार मोबदला’ मिळेल असे न्याय्य समाजाचे चित्र मांडले होते.न्यायाची अशी वेगवेगळ्या रूपातील मांडणी असली तरी आपल्या संविधानाच्या उद्देशिकेत ‘सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय’ अशा न्यायाच्या तीन आयामांचा उल्लेख केला आहे. समाजातील सर्वांना प्रतिष्ठा असेल, समानतेने वागणूक मिळेल तेव्हा सामाजिक न्याय प्रत्यक्षात येईल. सामाजिक न्याय व्हावा म्हणूनच काही शोषित, वंचित घटकांसाठी विशेष तरतुदी केलेल्या आहेत. सर्वांना प्रतिष्ठेने जगण्यासाठी सन्मानजनक वेतन मिळाले पाहिजे, रोजीरोटी मिळाली पाहिजे, तेव्हा आर्थिक न्याय होईल. सर्वांच्या मूलभूत नागरी हक्कांचे रक्षण होईल तेव्हा राजकीय न्याय अस्तित्वात येऊ शकतो. संविधानाच्या मूलभूत हक्कांमध्ये आणि निदेशक तत्त्वांमध्ये हे तीनही आयामांचा विचार करून तरतुदी केलेल्या आहेत.केवळ तरतुदी करून न्याय मिळत नाही. न्याय मिळण्यासाठी संस्थात्मक रचनेची आवश्यकता असते आणि विहित प्रक्रिया पार पाडण्याचीही. यासाठी न्यायपालिकेला स्वातंत्र्य हवे. न्यायपालिकेवर सत्तारूढ पक्षाचे, कायदेमंडळाचे दडपण असता कामा नये. सत्ताधारी पक्षाने न्यायपालिकेवर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।<br>
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।<br>
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पवारांच्या राष्ट्रवादीची परिस्थिती बिकट!

## देवेंद्र फडणवीसः परिवर्तन केले असते तर बिकट परिस्थिती त्यांची झाली नसती

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशाची परिस्थिती बिकट नाही तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची परिस्थिती बिकट आहे. त्यांनी योग्य वेळी परिवर्तन केले असते तर बिकट परिस्थिती त्यांची झाली नसती, असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साताऱ्यात व्यक्त केले. खासदार उदयनराजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी खास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जलमंदिर पॅलेस येथे आले होते.**



येथे त्यांनी भवानी मातेचे दर्शन घेतले. राजमातांचे आर्शिवाद घेतले. खासदार उदयनराजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. छत्रपती दमयंतीराजे भोसले यांनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले. उदयनराजेंना शुभेच्छा द्यायला साताऱ्यात आलो याचा मला आनंद आहे. त्यांचे आणि माझे संबंध भावासारखे आहेत. आमची मैत्री आहे. त्यामुळे निश्चितच राजवाडयात येवून त्यांचा सत्कार करणे ही माझी मनापासून इच्छा होती. ती आज पूर्ण करता आली आणि आईसाहेबांचा आर्शिवाद मला घेता आला, असे त्यांनी सांगितले.देशाची परिस्थिती बिकट आहे, असा आरोप पवार यांचा आहे यावर त्यांनी वरील उत्तर दिले. शरद पवार रायगडावर गेले. त्याचे खरे श्रेय अजित पवारांना दिले पाहिजे. त्यांनी पवार रायगडावर चाळीस वर्षानंतर पाठवले. चाळीस वर्षानंतर पवार छत्रपती शिवरायांच्या चरणी लिन झाले. याचा मला मनस्वी आनंद होत आहे, असे स्पष्ट मतही त्यांनी व्यक्त केले. भाजपाची साताऱ्यात उमेदवारी उदयनराजेंना मिळणार काय असे विचारले असता ते म्हणाले, भाजपामध्ये एक प्रक्रिया असते. पहिल्यांदा जागा वाटप करणार आहोत. इतर पक्षाप्रमाणे बीजेपीमध्ये कधीही अशी घोषणा होत नाही, असे सांगत चर्चा अनेक असतात. माध्यमांमध्ये जास्त असतात, असे उत्तर देत ते म्हणाले, खासदार उदयनराजे आणि माझे संबंध वेगळे आहेत. त्यांच्यासोबत मी नेहमीच आहे. महायुतीत बसून कोणी कुठल्या जागा लढायचे हे अजून ठरायचे आहे. चर्चेची प्राथमिक फेरी झाली आहे. बऱ्यापैकी प्रश्न सुटलेले आहेत. अजून एक दोन फेऱ्या कराव्या लागतील. त्यानंतर सर्व प्रश्न ठीक होईल. त्यानंतर कोणी कुठल्या जागा लढवायच्या हे ठरले की मी तुम्हाला सांगेन, माझ्यासारख्या नेत्याने अटकलबाजी करणे किंवा त्या ठिकाणी फोरकास्टिंग करणे त्या लेव्हलचा मी नाही. त्यामुळे योग्य वेळी सर्व गोष्टी तुम्हाला सांगणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.बच्चूकडू शिवसेनेसोबत आहेत. कधी कोणाच्या मनासारखे झाले नाही. ईव्हीएमच्या प्रश्नावर म्हणाले, ईव्हीएमबाबत जेव्हा जिंकतात तेव्हा ईव्हीएम चांगली असते आणि हारतात तेव्हा ती खराब असते. इलेक्शन कमिनशनने सगळ्या पक्षांना ओपन चॅलेंज दिले होते. ज्यांच्या जवळ ईव्हीएम मशिन टेंपरिंग करण्याचे तंत्रज्ञान असेल त्यांनी आम्हाला करुन दाखवावे, एकही पक्ष देशातला करु शकलेला नाही. सुप्रिम कोर्टाने देखील त्या संदर्भात निर्णय दिलेला आहे. त्यामुळे हारायची मानसिकता झाली की ईव्हीएम आठवते, असा टोला ईव्हीएम मशिनला विरोध करणाऱ्यांना त्यांनी लगावला. भाजपा सगळयांना घेवून चालते. कधी कोणाला त्यांच्या मनासारखे झाले नाही. ते आम्हाला शिव्या देतात. आम्ही मोठे आहोत. आम्ही ऐकून घेतो, असे मार्मिक उत्तर त्यांनी दिले. येथे त्यांनी भवानी मातेचे दर्शन घेतले. राजमातांचे आर्शिवाद घेतले. खासदार उदयनराजे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. छत्रपती दमयंतीराजे भोसले यांनी त्यांचे औक्षण करून स्वागत केले. उदयनराजेंना शुभेच्छा द्यायला साताऱ्यात आलो याचा मला आनंद आहे. त्यांचे आणि माझे संबंध भावासारखे आहेत. आमची मैत्री आहे. त्यामुळे निश्चितच राजवाडयात येवून त्यांचा सत्कार करणे ही माझी मनापासून इच्छा होती. ती आज पूर्ण करता आली आणि आईसाहेबांचा आर्शिवाद मला घेता आला, असे त्यांनी सांगितले.

### एक दोन फेऱ्या कराव्या लागतील

» देशाची परिस्थिती बिकट आहे, असा आरोप पवार यांचा आहे यावर त्यांनी वरील उत्तर दिले. शरद पवार रायगडावर गेले. त्याचे खरे श्रेय अजित पवारांना दिले पाहिजे. त्यांनी पवार रायगडावर चाळीस वर्षानंतर पाठवले. चाळीस वर्षानंतर पवार छत्रपती शिवरायांच्या चरणी लिन झाले. याचा मला मनस्वी आनंद होत आहे, असे स्पष्ट मतही त्यांनी व्यक्त केले. भाजपाची साताऱ्यात उमेदवारी उदयनराजेंना मिळणार काय असे विचारले असता ते म्हणाले, भाजपामध्ये एक प्रक्रिया असते. पहिल्यांदा जागा वाटप करणार आहोत. इतर पक्षाप्रमाणे बीजेपीमध्ये कधीही अशी घोषणा होत नाही, असे सांगत चर्चा अनेक असतात. माध्यमांमध्ये जास्त असतात, असे उत्तर देत ते म्हणाले, खासदार उदयनराजे आणि माझे संबंध वेगळे आहेत. त्यांच्यासोबत मी नेहमीच आहे. महायुतीत बसून कोणी कुठल्या जागा लढायचे हे अजून ठरायचे आहे. चर्चेची प्राथमिक फेरी झाली आहे. बऱ्यापैकी प्रश्न सुटलेले आहेत. अजून एक दोन फेऱ्या कराव्या लागतील

# सरकारी काम घेऊन कोणीही या बंगल्यावर येऊ शकतं

## जरांगेंच्या 'एन्काऊंटर'च्या आरोपावर फडणवीसांचं मोठं भाष्य

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. फडणवीस मला एन्काउंटरच्या माध्यमातून मारण्याचा प्रयत्न करत आहेत, असा दावा जरांगेंनी केलाय.**

यावरच आता फडणवीस यांनी महत्त्वाचं भाष्य केलंय. जरांगेंनी केलेले आरोप हे धादांत खोटे आहेत. आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येकालाच आहे. मात्र कायद्याचे पालन होत नसेल तर पोलिसांना योग्य कारवाई करावीच लागेल, असे फडणवीस म्हणाले. ते आज (२५ फेब्रुवारी) मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले की, सागर बंगला हा सरकारचा आहे. सरकारी काम घेऊन कोणीही या बंगल्यावर येऊ शकतो. मनोज जरांगे हे कोणत्या निराशेतून बोलत आहेत. त्यांना कोणती सहानुभूती घ्यायची आहे, याची मला कल्पना नाही. त्यांनी



केलेले आरोप बिनबुडाचे आहेत. ते धादांत खोटं बोलत आहेत. मराठा आरक्षणासाठी मी काय केलं हे मराठा समाजाला माहिती आहे. आजचा सारथी किंवा अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ हे मराठा विद्यार्थी, तरुणांसाठी आशेचं स्थान आहे. त्याची सुरुवात मी केलेली आहे. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनांत वाढ केलेली आहे."मराठा आरक्षण मी उच्च न्यायालयात टिकवलेलं आहे. जोपर्यंत मी मुख्यमंत्री होतो तोपर्यंत ते आरक्षण सर्वोच्च न्यायालयातही टिकवलं. माझं मुख्यमंत्रिपद गेल्यानंतर ज्यांच्यावर मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी होती, ते मुख्यमंत्री सर्वोच्च न्यायालयात आरक्षण टिकवू शकलेले नाहीत. त्यामुळे कोणाच्या म्हणण्यावर मराठा समाज विश्वास ठेवेल हे माणणाऱ्यांत मी नाही," असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.मनोज जरांगे यांना खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची फूस आहे, असा अप्रत्यक्ष आरोप फडणवीस यांनी केला. ते म्हणाले की, मनोज जरांगे जी स्क्रिप्ट बोलत आहेत, तीच स्क्रिप्ट याआधी उद्धव ठाकरे बोलत होते. ज्या स्क्रिप्टवर शरद पवार बोलत होते, नेमके तेच विषय मनोज जरांगे मांडत आहेत. त्यांनी हेच विषय का मांडावेत असा प्रश्न मला पडला आहे.

### जरांगेंच्या पाठीशी कोण आहे

» **या**च कारणामुळ जरांगेंच्या पाठीशी कोण आहे, याची काहीशी कल्पना आमच्याकडे आहे. योग्य वेळी ती बाहेर येईल. तुर्तास एवढंच आहे की कायदा, सुव्यवस्था न बिघडवता कोणीही आंदोलन केलं तरी आमची हरकत नाही. मात्र कायद्याचे पालन होत नसेल तर पोलिसांना योग्य कारवाई करावीच लागेल.

# आमचे नागरीकही तसे नाहीत!

## मालदीवबाबत भारतीय लोकांची धारणा बदलली पाहिजे

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मालदीव हा देश गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहेत. भारतात या देशाबद्दल बरीच चर्चा चालू आहे. उभय देशांमध्ये पर्यटनावरून झालेल्या वादानंतर भारताने मालदीवकडे सपशेल दुर्लक्ष केलं आहे. त्यामुळे मालदीवमधील नेते आता भारतावर कौतुकाचा वर्षाव करू लागले आहेत. दरम्यान, मालदीवच्या माजी संरक्षण मंत्री मारिया दिदी यांनी मालदीव आणि भारताच्या संबंधांबद्दल मोठं वक्तव्य केलं आहे. मारिया दिदी म्हणाल्या, सध्या मालदीव भारतात खूप चुकीच्या कारणांमध्ये प्रसिद्ध होत आहे. प्रामुख्याने भारतात समाजमाध्यमांवर मालदीवची प्रतिमा खराब होत आहे. भारतातल्या समाजमाध्यमांवर दिसतोय तसा आमचा मालदीव नक्कीच नाही.**




मारिया दिदी म्हणाल्या, भारतातल्या समाजमाध्यमांवर मालदीव आणि मालदीवच्या लोकांबद्दल जी चर्चा चालू आहे तसा आमचा देश नाही, आमचे नागरीकही तसे नाहीत. इतर देशांमधून आमच्या देशात आलेल्या लोकांचं आम्ही स्वागत करतो. परदेशी पर्यटक आमच्या देशात आलेलं आम्हाला आवडतं. आम्ही नेहमीच त्यांच्या स्वागतासाठी तत्पर असतो. मला असं वाटतं की, मालदीवबाबत भारतीय लोकांची धारणा बदलली पाहिजे. मारिया दिदी या फर्स्टपोस्ट डिफेन्स समिटमध्ये बोलत होत्या. यासह मालदीवच्या माजी संरक्षण मंत्र्यांनी भारताचं कौतुकही केलं. मारिया दिदी म्हणाल्या, जेव्हा-जेव्हा मालदीवला गरज होती तेव्हा आपला शेजारी देश म्हणजेच भारताने आपली मदत केली आहे. भारताने नेहमीच मालदीवच्या अडचणींच्या काळात मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. तसेच भारत श्रीलंकेचीही मदत करतो. भारतासह शेजारील राष्ट्रांशी सलोख्याचे संबंध ठेवणं हे आमच्या सरकारचं पहिलं उद्दीष्ट होतं. मला आशा आहे की, भारत आणि मालदीवमधील संबंध सुधारतील, उभय देशांमधील परिस्थिती पहिल्यासारखी होईल. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी लक्षद्वीप बेटांना भेट दिली होती. मोदींनी त्यांच्या या सहलीदरम्यानचे काही फोटो समाजमाध्यमांवर शेअर केले होते. भारत गेल्या काही महिन्यांपासून लक्षद्वीपचा आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळ म्हणून प्रचार करत असतानाच स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासाठी पुढाकार घेतल्यानंतर अनेकांचं लक्ष लक्षद्वीपकडे वळलं. परंतु, हे पाहून भारताच्या नैऋत्येला असलेल्या मालदीव या देशातील काही लोकांचा तिळपापड झाला. मालदीवमधील काही नागरिकांनी आणि मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांच्या मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांनी भारताचा अपमान करणाऱ्या टिप्पण्या केल्या. यापैकी काही जण एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी भारतीय नागरिकांवरही वर्णद्वेषी टीका केली. पंतप्रधान मोदींवरही टीका केली गेली. त्यामुळे मालदीवला गेल्या काही महिन्यांपासून भारतीय नागरिकांच्या रोषाचा सामना करावा लागत आहे. मालदीवमधील मंत्र्यांच्या भारतावरील अपमानास्पद टीकेनंतर भारतात मालदीववर बहिष्कार टाकण्याबाबत चर्चा सुरू झाली. समाजमाध्यमांवर बॉयकॉट मालदीव असा हॅशटॅग काही दिवस ट्रेंडिंगमध्ये होता. या वादात सामान्य नागरिकांसह राजकारणी, खेळाडू आणि चित्रपट कलाकारांनीदेखील उडी घेतली. त्यामुळे वातावरण अधिकच तापलं. परिणामी मालदीवला जाणाऱ्या भारतीय पर्यटकांची संख्या कमी होऊ लागली आहे. याचा मालदीवच्या पर्यटनाला फटका बसत आहे. मारिया दिदी म्हणाल्या, भारतातल्या समाजमाध्यमांवर मालदीव आणि मालदीवच्या लोकांबद्दल जी चर्चा चालू आहे तसा आमचा देश नाही, आमचे नागरीकही तसे नाहीत. इतर देशांमधून आमच्या देशात आलेल्या लोकांचं आम्ही स्वागत करतो. परदेशी पर्यटक आमच्या देशात आलेलं आम्हाला आवडतं. आम्ही नेहमीच त्यांच्या स्वागतासाठी तत्पर असतो. मला असं वाटतं की, मालदीवबाबत भारतीय लोकांची धारणा बदलली पाहिजे. मारिया दिदी या फर्स्टपोस्ट डिफेन्स समिटमध्ये बोलत होत्या.यासह मालदीवच्या माजी संरक्षण मंत्र्यांनी भारताचं कौतुकही केलं. मारिया दिदी म्हणाल्या, जेव्हा-जेव्हा मालदीवला गरज होती तेव्हा आपला शेजारी देश म्हणजेच भारताने आपली मदत केली आहे. भारताने नेहमीच मालदीवच्या अडचणींच्या काळात मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. श्रीलंकेचीही मदत करतो. भारतासह शेजारील राष्ट्रांशी सलोख्याचे संबंध ठेवणं हे आमच्या सरकारचं पहिलं उद्दीष्ट होतं. मला आशा आहे की, भारत आणि मालदीवमधील संबंध सुधारतील, उभय देशांमधील परिस्थिती पहिल्यासारखी होईल. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी लक्षद्वीप बेटांना भेट दिली होती.

### समाजमाध्यमांवर मालदीव बॉयकॉट

मोदींनी त्यांच्या या सहलीदरम्यानचे काही फोटो समाजमाध्यमांवर शेअर केले होते. भारत गेल्या काही महिन्यांपासून लक्षद्वीपचा आंतरराष्ट्रीय पर्यटनस्थळ म्हणून प्रचार करत असतानाच स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासाठी पुढाकार घेतल्यानंतर अनेकांचं लक्ष लक्षद्वीपकडे वळलं. परंतु, हे पाहून भारताच्या नैऋत्येला असलेल्या मालदीव या देशातील काही लोकांचा तिळपापड झाला. मालदीवमधील काही नागरिकांनी आणि मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांच्या मंत्रिमंडळातील काही मंत्र्यांनी भारताचा अपमान करणाऱ्या टिप्पण्या केल्या. यापैकी काही जण एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी भारतीय नागरिकांवरही वर्णद्वेषी टीका केली. पंतप्रधान मोदींवरही टीका केली गेली. त्यामुळे मालदीवला गेल्या काही महिन्यांपासून भारतीय नागरिकांच्या रोषाचा सामना करावा लागत आहे. मालदीवमधील मंत्र्यांच्या भारतावरील अपमानास्पद टीकेनंतर भारतात मालदीववर बहिष्कार टाकण्याबाबत चर्चा सुरू झाली. समाजमाध्यमांवर बॉयकॉट मालदीव असा हॅशटॅग काही दिवस ट्रेंडिंगमध्ये होता.

# हमास जे करतं तेच पश्चिम बंगालमध्ये होत आहे’

## संदेशखली : भाजपा नेत्याची ममता बॅनर्जी यांच्यावर टीका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पश्चिम बंगालच्या संदेशखली येथे गेल्या अनेक दिवसांपासून तणावाची परिस्थिती आहे. भाजपा आणि काँग्रेसच्या नेत्यांना संदेशखलीचा दौरा करण्यापासून रोखण्यात आले होते. यावरुन आता पश्चिम बंगालच्या विधानसभेचे विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी शनिवारी दिल्लीतील जेएनयू विद्यापीठात बोलत असताना टीका केली आहे.**

“इस्रायलमध्ये हमासने जे केले, ते पश्चिम बंगालमध्ये होत आहे. संदेशखलीमध्ये अग्नितांडव होत आहे. महिलांना छळाचा सामना करावा लागतोय. पश्चिम बंगालची वाताहत होण्याची सुरुवात डाव्या पक्षांच्या राज्यात झाली. मग मार्क्सवादी, माओवादी, तुकडे तुकडे गँग ते सीपीआय (एम) ने राज्याची ही अवस्था केली आहे”, असेही सुवेंदू अधिकारी म्हणाले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर टीका करताना सुवेंदू अधिकारी म्हणाले की, मुख्यमंत्र्यांना आता ममता दीदी म्हणणे सोडून दिले पाहिजे, त्या आता काकू झाल्या आहेत. मी त्यांचा



नंदीग्राम विधानसभा निवडणुकीत पराभव केला होता. तेव्हा त्यांनी माझ्याविरोधात ४२ खटले दाखल केले होते. इस्रायलमध्ये हमासने जे केले, तेच आज पश्चिम बंगालमध्ये होत आहे.सुवेंदू अधिकारी पुढे म्हणाले की, यापुढे पश्चिम बंगालमध्ये डबल इंजिनचे सरकार स्थापन होईल. यासाठी अधिकारी यांनी एक घोषणा दिली. “संदेशखली, ममता की कुर्सी करेगी खाली”,ताना अधिकारी म्हणाले की, ममता बॅनर्जी या किम जोंग उनचं भारतातील छोटं रुप आहे. तसेच ममता बॅनर्जी यांच्या घोषणा बांगलादेशमधून येतात,.

### संदेशखली प्रकरण काय आहे?

भाजपाचे पश्चिम बंगालमधील प्रदेशाध्यक्ष डॉ. सुकांता मजुमदार हेदेखील जेएनयू मधील कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनीही मुख्यमंत्री बॅनर्जी यांच्यावर टीका केली. ममता बॅनर्जी आणि भारतविरोधी घटकांचा खोलवर संबंध असल्याचे ते म्हणाले. संदेशखली मधील महिलांच्या प्रतिक्रियेचा हवाला देऊन सुकांता मजुमदार म्हणाले की, शेख शहाजानने हिंदू महिलांवर अत्याचार केले. तो जानेवारी महिन्यापासून बेपत्ता आहे. फक्त पश्चिम बंगालमधील पोलिसांनाच त्याचा ठावठिकाणा माहीत आहे. इस्रायल किंवा पॅलेस्टाईनमध्ये एखादा हल्ला झाला की, भारतात निदर्शने केली जातात. पण आता पश्चिम बंगालच्या परिस्थितीबाबत हेच लोक शांत का बसले आहेत?

# साथिया'च्या सेटवर हजारोंची गर्दी जमली अन् ...

राणी मुखर्जी आणि विवेक ओबेरॉय यांची जोडी तब्बल २१ वर्षांपूर्वी 'साथिया' चित्रपटाच्या निमित्ताने जमली होती. राणीचे सलग काही चित्रपट फ्लॉप ठरल्याने विवेकबरोबरचा 'साथिया' तिच्या आयुष्यातील सर्वात मोठा टर्निंग पॉइंट ठरला. चित्रपट प्रदर्शित झाल्यावर या दोघांच्याही अभिनयाचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात आलं. परंतु, प्रत्यक्षात या चित्रपटाचं शूटिंग करताना विवेकला अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. याविषयी त्याने नुकत्याच 'ह्युमन्स ऑफ बॉम्बे'ला दिलेल्या मुलाखतीत खुलासा केला आहे. बॉलीवूडचा प्रसिद्ध दिग्दर्शक राम गोपाल वर्माने विवेकला हा चित्रपट करू नकोस असा सल्ला दिला होता. याविषयी सांगताना अभिनेता म्हणाला, "साथिया चित्रपट करून नकोस असा सल्ला मला प्रत्येकाने दिला. 'तू ॲक्शन हिरो आहेस... प्रेमकथेत काम कसा करणार?' असं सगळेजण बोलत होते. माझे गुरू राम गोपाल वर्मा देखील माझ्यावर संतापले होते. पण, त्यांच्याकडून परवानगी मागण्यापेक्षा, त्यांची क्षमा मागून हा चित्रपट करेन असं मी ठरवलं होतं. मला




चित्रपटाची कथा खूपच आवडली होती. 'साथिया'चा दिग्दर्शक शाद अली माझा शाळकरी मित्र आहे. सुरुवातीला तो अभिषेकबरोबर चित्रपट बनवत होता परंतु, ते काही कारणास्तव शक्य झालं नाही."विवेक पुढे म्हणाला, "शादने मला त्याच्या घरी बोलावलं होतं. त्यावेळी आम्ही मणिरत्नमचा 'आलापयुथे' हा मूळ चित्रपट पाहिला. याच चित्रपटावर 'साथिया' आधारित आहे. तो चित्रपट पाहताना मी शादबरोबर काम करायचं ठरवलं. रेल्वे स्टेशनला शूटिंग करताना मी तिथेच बेंचवर झोपायचो कारण, तेव्हा आमच्याकडे बजेट नव्हतं. मला कोणीही ओळखत नव्हतं. माझ्याकडे मेकअप/व्हॅनिटी व्हॅन नसल्याने मी रेस्टॉरंटच्या स्वच्छतागृहात कपडे बदलायचो. आम्हाला एका दिवसात चार सीन शूट करायचे होते. त्यामुळे दिवसाला १८ ते २० तास मी काम केलं.""चित्रीकरण सुरू असताना आम्ही अनेकदा शूटिंगसाठी स्वतःचं सामान घेऊन जायचो. अशातच माझा पहिला चित्रपट 'कंपनी' प्रदर्शित झाला आणि माझं आयुष्य रातोरात बदलून गेलं.

## नवरा म्हणून माझ्यात काय कमी

बॉलीवूड अभिनेता आमिर खान मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणूनही ओळखला जातो. आमिर अभिनयाबरोबर त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असतो. साल २००५ मध्ये आमिरने किरण रावबरोबर लग्नगाठ बांधली. मात्र, लग्नाच्या काही वर्षातच २०२१ मध्ये दोघांनी घटस्फोट घेतला. आमिर व किरणच्या घटस्फोटाच्या निर्णयाने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. आता लग्नाच्या तीन वर्षानंतर आमिरने घटस्फोटाबाबत भाष्य केले आहे. नुकतेच आमिर एबीपीच्या आयडिया ऑफ इंडिया समिटमध्ये सहभागी झाला होता. या मुलाखतीत त्याने त्याच्या करिअरबरोबर वैयक्तिक आयुष्याबाबतही अनेक खुलासे केले. दरम्यान, आमिरने या मुलाखतीत त्याच्या व किरणच्या घटस्फोटाबाबतही भाष्य केले.आमिर म्हणाला, "तुम्हा सर्वांना माहीत असेलच की, आमचा नुकताच घटस्फोट झाला आहे. एक दिवस मी संध्याकाळी बसलो होतो, तेव्हा मी किरणला म्हणालो की, नवरा म्हणून माझ्यात काय कमी होती? मी स्वतःमध्ये काय सुधारणा करू शकतो? आता मी आयुष्यात पुढे जात आहे. तर यावर नक्कीच विचार करेन." आमिरच्या या प्रश्नावर किरणने त्याला लिस्टच वाचून दाखवली. "किरण मला म्हणाली की, लिहून घे. तू खूप बोलतोस. तू दुसऱ्या कोणालाच बोलून देत नाहीस.


## रकुल-जॅकीचा जबरदस्त डान्स



अभिनेत्री रकुल प्रीत सिंग व अभिनेता जॅकी भगनानी यांनी २१ फेब्रुवारीला गोव्यात लग्नगाठ बांधली. गेल्या अनेक दिवसांपासून दोघांच्या लग्नाची चांगलीच चर्चा रंगली होती. अखेर दोघांनी लग्न करत नव्या आयुष्याला सुरुवात केली. दोघांच्या लग्नातील फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल झाले होते. यावेळी लग्नातील दोघांच्या लूकची चांगलीच चर्चा रंगली. आता दोघांच्या संगीत कार्यक्रमातील फोटो समोर आले आहेत.रकुलने आपल्या इन्स्टाग्रामवर संगीत कार्यक्रमातील काही फोटो शेअर केले आहेत. एका फोटोत दोघे एकमेकांचा हात पकडून कार्यक्रमस्थळी येताना दिसत आहेत. तर दुसऱ्या फोटोत दोघे डान्स करताना दिसत आहेत. फोटोवरुन रकुल व जॅकीने संगीत कार्यक्रमात धमाकेदार डान्स केला असल्याचे दिसून येत आहे. सोशल मीडियावर हे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. अनेक चाहत्यांनी या फोटोवर कमेंट केल्या आहेत.रकुल प्रीतने तिच्या संगीत कार्यक्रमासाठी प्रसिद्ध फॅशन डिझायनर फाल्गुनी पिकॉकने डिझाईन केलेला लेहेंगा परिधान केला होता. संगीतामध्ये, रकुलने पीच रंगाचा लेहेंगा घातला होता, ज्यावर एम्ब्रॉयडरी केली होती. तर गळ्यात रकुलने हिऱ्यांचा हार घातला होता. तर जॅकीने संगीत कार्यक्रमासाठी वेलवेटपासून बनवलेला गडद निळ्या रंगाचा सूट परिधान केला होता. या लूकमध्ये दोघेही खूपच सुंदर दिसत होते.रकुल व जॅकीने पंजाबी आणि सिंधी रीतीरिवाजानुसार लग्नगाठ बांधली. रकुल पंजाबी आहे. त्यामुळे दोघांचा विवाह पहिल्यांदा 'आनंद कारज' (पंजाबी रीतीरिवाज)नुसार झाला. तर जॅकी हा सिंधी कुटुंबातील असल्यामुळे पंजाबी पद्धतीने लग्न केल्यानंतर त्यांनी सिंधी पद्धतीने पुन्हा एकदा लग्न केले. लग्नानंतर दोघांनी पाहुण्यांसाठी पार्टीही आयोजित केली होती.

## अनंत -राधिकाच्या कार्यक्रमात रिहाना

देशातील सर्वात श्रीमंत व्यक्ती, रिलायन्स इंडस्ट्रीज चेअरमन मुकेश अंबानी यांचा छोटा मुलगा अनंत अंबानी लग्नबंधनात अडकणार आहे. राधिका मर्चेंट हिच्याशी अनंत अंबानी लग्न करणार आहे. लग्नाआधीचा (प्री-वेडिंग) कार्यक्रम गुजरातमधील जामनगरमध्ये आयोजित करण्यात आला आहे. १ मार्च ते ३ मार्चपर्यंत प्री-वेडिंगचा हा कार्यक्रम असणार आहे. या कार्यक्रमासाठी परदेशासह देशातील दिग्गज मंडळी उपस्थित राहणार आहेत. शिवाय या कार्यक्रमात हॉलीवूडपासून ते बॉलीवूडपर्यंतचे कलाकार परफॉर्म करणार असल्याचं समोर आलं आहे.गेल्या वर्षी १९ जानेवारीला अनंत अंबानी व राधिका मर्चेंट यांचा साखरपुडा झाला होता. आता १२ जुलैला मुंबईत यांचा शाही लग्नसोहळा होणार आहे. पण त्यापूर्वी १ मार्चपासून तीन दिवसांसाठी प्री-वेडिंग कार्यक्रमाचे आयोजन केलं आहे. सध्या या कार्यक्रमाची जोरदार चर्चा रंगली आहे.अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग कार्यक्रमात जगप्रसिद्ध रिहानापासून डेविड ब्लेन दमदार परफॉर्म करणार आहेत. तसेच अरिजित सिंह, दिलजीत दोसांझ यांच्यासह अजय-अतुल देखील परफॉर्म करणार आहेत. याशिवाय, अनंत व राधिकाच्या प्री-वेडिंग कार्यक्रमाला दिग्गज कलाकार मंडळी हजेरी लावणार आहेत. अमिताभ बच्चन, रजनीकांत, अक्षय कुमार, शाहरुख खान, आमिर खान, सलमान खान, सैफ अली खान, माधुरी दीक्षित, रणवीर सिंह, दीपिका पदुकोण, रणबीर कपूर, आलिया भट्ट, विक्की कौशल, कतरिना कैफ असे अनेक सेलिब्रिटी या कार्यक्रमात पाहायला मिळणार आहेत. या कार्यक्रमात संगीत, डान्स, कार्निव्हल मस्ती, व्हिज्युअल आर्ट आणि एक खास सरप्राइज परफॉर्मन्स होणार आहे.



## शाहरुख खानकडे आहेत तब्बल 'एवढे' फोन

बॉलीवूड किंग शाहरुख खान नेहमी चर्चेत असतो. अभिनयाच्या जोरावर शाहरुखने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सोशल मीडियावर शाहरुख मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करीत तो चाहत्यांना अपडेट देत असतो. जगभरात शाहरुखचे लाखो चाहते आहेत. शाहरुखबद्दल प्रत्येक गोष्ट जाणून घेण्यास चाहते नेहमीच उत्सुक असतात.शाहरुखने टेलिव्हिजनवरून करिअरला सुरुवात केली. मालिकेपासून चित्रपटांपर्यंतचा शाहरुखचा प्रवास म्हणावा तेवढा सोपा नव्हता. शाहरुखच्या कठीण काळात त्याला मदत केली ती निर्मिते विवेक वासवानी यांनी. वासवानी यांनी शाहरुखला चित्रपटात केवळ लॉंचच केले नाही, तर संघर्षमय काळात त्याला आपल्या घरी राहण्यास जागाही दिली होती. एकेकाळी विवेक व शाहरुख खास मित्र मानले जायचे. अनेक किस्से सांगितले आहेत.सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत विवेक यांनी शाहरुखबाबत अनेक खुलासे केले आहेत. ते म्हणाले, "शाहरुख आणि मी एकमेकांशी बोलतही नाही आणि भेटतही नाही. पण जेव्हा कधी आम्ही एकमेकांना भेटतो, तेव्हा आम्हाला आम्ही कालच भेटलो होतो.

# भारतासमोर 192 धावांचे लक्ष्य!

## » इंग्लंडचा संघ दुसऱ्या डावात 145 धावांत गारद

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना रांचीत खेळला जात आहे. या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी इंग्लंडचा दुसरा डाव १४५ धावांवर आटोपला. इंग्लंडने पहिल्या डावात ३५३ धावा केल्या होत्या. त्याचवेळी, भारताचा पहिला डाव आज सकाळी ३०७ धावांवर गारद झाला. पहिल्या डावाच्या आधारे इंग्लिश संघाकडे ४६ धावांची आघाडी होती. अशा स्थितीत इंग्लिश संघाची एकूण आघाडी १९१ धावांची असून भारताला विजयासाठी १९२ धावांचे लक्ष्य मिळाले आहे. भारताकडून रविचंद्रन अश्विनने सर्वाधिक पाच विकेट्स घेतल्या.**



जर टीम इंडिया हा सामना जिंकण्यात यशस्वी ठरला तर मालिकेत ३-१ अशी अजेय आघाडी मिळवेल. पहिली कसोटी इंग्लंडने तर दुसरी आणि तिसरी कसोटी भारताने जिंकली. रविचंद्रन अश्विनने पाच विकेट घेतल्या. त्याने ३५व्या पाच विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर कुलदीपने चार आणि रवींद्र जडेजाने एक विकेट घेतली. इंग्लंडकडून झॅक क्राऊलीने सर्वाधिक ६० धावा केल्या.इंग्लंडच्या दुसऱ्या डावाची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर बेन डकेट १५ धावा करून बाद झाला. ऑली पोप एकही धाव न काढता रवी अश्विनचा बळी ठरला. जो रूट ११ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. जॉनी बेअरस्टोने ३० धावा केल्या. कर्णधार बेन स्टोक्स ४ धावा करून कुलदीप यादवचा बळी ठरला. तर बेन फॉक्सने १७ धावा केल्या. इंग्लंडच्या सहा फलंदाजांना दुहेरी आकडा पार करता आला नाही. त्यामुळे इंग्लिश संघ अवघ्या १४५ धावांवर गारद झाला. मात्र, रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघासमोर १९२ धावांचे लक्ष्य आहे.तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला. भारताने १९२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना तिसऱ्या दिवसअखेर ८ षटकांनंतर बिनबाद ४० धावा केल्या आहेत. रोहित शर्मा २४ आणि यशस्वी जैस्वाल १६ धावांवर नाबाद परतले. आता भारताला विजयासाठी चौथ्या दिवशी आणखी १५२ धावा करायच्या आहेत. त्याचबरोबर इंग्लंडला हा सामना जिंकण्यासाठी १० विकेट्स घेण्याचा गरज आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील सामन्यात डीआरएस हा सर्वात चर्चेचा विषय ठरला. अनेक 'अंपायर्स कॉल'चे निर्णय टीम इंडियाच्या विरोधात गेले. त्यामुळे गोलंदाजी करताना भारतीय संघाने पहिल्या दिवशी लवकर रिव्ह्यू गमावले होते. पण रोहित शर्माला ही चूक पुन्हा करायची नव्हती. दुसऱ्या डावात भारतीय संघ गोलंदाजी करताना हिटमॅन रिव्ह्यूबाबत गोंधळलेला दिसला. त्यामुळे तो जडेजाने केलेल्या अपीलनंतर डीआरएस घेण्याबाबत सहकाऱ्यांशी चर्चा करतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. रोहित शर्माने शेवटच्या सेकंदात घेतला निर्णय – ही घटना अशा वेळी घडली, जेव्हा इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सविरुद्ध रवींद्र जडेजा एलबीडब्ल्यूची अपील केली, तेव्हा या अपीलवर अंपायरने त्याला नॉट आऊट घोषित केले. मात्र, जडेजाला त्याच्या चेंडूवर पूर्ण विश्वास होता आणि त्याने कर्णधार रोहित शर्माला रिव्ह्यू घेण्याची विनंती केली. यानंतर रोहितने जुरेलचाही सल्ला घेतला.

### 152 धावा करायच्या आहेत

» दरम्यान रोहितने डीआरएस घेण्यापूर्वी आपल्या सहकाऱ्यांना जे सांगितले, ते स्टंप माइकमध्ये टिपले गेले आहे.रोहितचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो खेळाडूंना सांगत होता की, 'काही सेकंद बाकी आहेत, सर्वांनी डोकं लावा.' शेवटच्या सेकंदापर्यंत खेळाडूंचा योग्य प्रतिसाद न मिळाल्याने रोहित शर्माने रिव्ह्यू घेण्याचे संकेत दिले. पण यानंतर रोहितला नशीबाने साथ दिली नाही. कारण रिप्ले पाहिल्यानंतर अंपायर्स कॉल देण्यात आला. त्यामुळे इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्स बचावला.स्टंप माईकमध्ये रोहित शर्माचा आवाज ऐकून कॉमेंट्री बॉक्समध्ये बसलेल्या दिनेश कार्तिक आणि दीपदास गुप्ता यांनी मजा घेतली. दिनेश कार्तिक म्हणाला, 'आता आम्हाला माहित आहे की डीआरएस घेण्यासाठी कशी चर्चा होते.' सहकारी अनुभवी यष्टिरक्षक-फलंदाज दीपदास गुप्ता पुन्हा व्हिडिओ पाहिल्यानंतर हसताना दिसला.सामन्याबद्दल बोलायचे, तर तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला आहे. १९२ धावांचा पाठलाग करताना एकही विकेट न गमावता ४० धावा केल्या आहेत. यष्टीमागे रोहित शर्मा २४ आणि जैस्वाल १६ धावांवर नाबाद परतले. आता भारताला विजयासाठी चौथ्या दिवशी आणखी १५२ धावा करायच्या आहेत.

# भारतासाठी संकटमोचक ठरलेल्या जुरेलसाठी रिंकूची भावनिक पोस्ट

## » रांची कसोटीत संकटमोचक ध्रुव जुरेलने 90 धावांची महत्त्वपूर्ण खेळी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रांची येथे भारत आणि इंग्लंड यांच्यात पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना खेळला जात आहे. या सामन्यात भारताचा पहिला डाव तिसऱ्या दिवशी ३०७ धावांवर आटोपला. इंग्लंडने पहिल्या डावात ३५३ धावा केल्या होत्या. अशा स्थितीत इंग्लंड दुसऱ्या डावात ४६ धावांची आघाडी घेतली. मात्र, युवा ध्रुव जुरेलने तळातील फलंदाजांसह भारताचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचे अवघ्या १० धावांनी शतक हुकले. जुरेलच्या या खेळीनंतर भारताचा युवा सिक्सर किंग रिंकू सिंगने कौतुक केले.**





ध्रुव जुरेलचे पहिले कसोटी शतक झळकवण्यात अपयशी ठरला असला, तरी तो सर्वांची मनं जिंकण्यात यशस्वी झाला आहे. त्याने आपल्या ९० धावांच्या खेळीदरम्यान पहिल्यांदा कुलदीप यादवसह ७६ धावांची भागीदारी केली. त्यानंतर आकाश दीप फलंदाजीला आला आणि त्याने जुरेलबरोबर ४० धावांची भागीदारी केली. आता त्याच्या खेळीबद्दल त्याचा सहकारी रिंकू सिंगने एक भावनिक पोस्ट शेअर केली आहे.रिंकू सिंगने ध्रुवसाठी इन्स्टावर एक फोटो शेअर करताना लिहिले 'माझ्या भावा, स्वप्न साकार करण्याची वेळ आली आहे.' रिंकू सिंग आणि ध्रुव जुरेल खूप चांगले मित्र आहेत. दोघेही कधी कधी एकाच खोलीत राहत असत. जुरेलने एका मुलाखतीत असेही सांगितले होते की, केकेआरसाठी खेळताना गुजरात टायटन्सविरुद्ध एका षटकात ५ षटकार मारुन सामना जिंकवला होता, तेव्हा सर्वात पहिल्यांदा त्याने त्याला फोन केला होता.

### इंग्लंडने पहिल्या डावात 353 धावा केल्या

» आणि विचारले कसे वाटले.टीम इंडियाने एकवेळ १७७ धावांवर ७ विकेट गमावल्या होत्या. येथून जुरेलने भारताचा डाव शेवटपर्यंत सांभाळला. त्याने तळातील फलंदाजांसह महत्त्वपूर्ण भागीदारी रचून भारतीय संघाला सन्मानजनक स्थितीत नेले. त्याच्या खेळीमुळेच टीम इंडिया ३०० धावांचा टप्पा पार करू शकली. रांची कसोटीत भारताने पहिल्या डावात ३०७ धावा केल्या. भारतासाठी जुरेलने सर्वात मोठी खेळी खेळली. त्याने १४९ चेंडूत ६ चौकार आणि ४ षटकारांसह ९० धावा केल्या. त्याला टॉम हार्टलीने बाद केले.ड यांच्यात पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना खेळला जात आहे. या सामन्यात भारताचा पहिला डाव तिसऱ्या दिवशी ३०७ धावांवर आटोपला. इंग्लंडने पहिल्या डावात ३५३ धावा केल्या होत्या.